www.rajdand.com
सातारा शनिवार
२४.२.२०२४
पृष्ठ ४ ! मूल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# ‘भाजपाच्या ९० टक्के कार्यकर्त्यांना काहीच मिळणार नाही’

## काँग्रेस नेत्यांच्या पक्षप्रवेशावर देवेंद्र फडणवीस स्पष्टच म्हणाले



**मुंबई :** ''राजकारणात काम करत असताना प्रत्येक व्यक्तीला आपल्या भवितव्याची चिंता असते. काँग्रेसच्या नेत्यांना त्यांच्या भवितव्याबाबत अंधार दिसतो. त्यांच्यासमोर भविष्याबाबत मोठं प्रश्नचिन्ह आहे. काँग्रेसचे श्रेष्ठी पराभवापासून काही शिकताना दिसत नाहीत. त्यामुळे काँग्रेसचे अनेक नेते पंतप्रधान मोदींच्या कामामुळे प्रभावित झालेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विकासाच्या कामाचा झंझावात पाहून इतर पक्षातील अनेक नेत्यांना भाजपाबरोबर येऊन काम करण्याची इच्छा निर्माण झालेली आहे. अशोक चव्हाण असतील किंवा इतर राज्यातील काही नेते असतील, ते सर्व मुख्य प्रवाहात येऊन काम करण्यास इच्छूक आहेत. असे जे नेते भाजपात प्रवेश करत आहेत, त्यांना आम्ही सामावून घेत आहोत'', अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एबीपी लाईव्हला दिलेल्या मुलाखतीमध्ये मांडली.

पण मग भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांचे काय?

काँग्रेस आणि इतर पक्षातून आलेल्या नेत्यांना पद, प्रतिष्ठा मिळत असताना भाजपाच्या मूळ निष्ठावान कार्यकर्त्यांना जमिनीवर केवळ संघर्षच करावा लागणार का? असा प्रश्न मुलाखतीत फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर फडणवीस म्हणाले, ''भाजपाचा कार्यकर्ता हाच भाजपाचा आधार आहे. तोच भाजपाची खरी ताकद आहे. भाजपाच्या ९० टक्के कार्यकर्त्यांना माहिती आहे की, त्यांना जीवनात काहीही अक्षरशः काहीही मिळणार नाही. ते आमदार बनणार नाहीत किंवा लोकप्रतिनिधी होणार नाहीत. कारण लोकप्रतिनिधींची संख्या मर्यादीत आहे. तरीही भाजपाचा कार्यकर्ता काम करत राहतो. कारण त्याची काम करण्याची प्रेरणा सत्ता नसून विचार आहे. या कार्यकर्त्याच्या बळावरच भाजपा पक्ष पुढे जात आहे.''

''आज जेव्हा नवीन लोक पक्षात येत आहेत. तेव्हा कार्यकर्ता असे मानतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी पाहण्यासाठी जे करावे लागेल, ते केले पाहीजे. हे करताना भाजपाच्या कार्यकर्त्यांना कोणतेही दुःख किंवा चिंता वाटत नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये तो काम करण्यासाठी तयार आहे'', असेही देवेंद्र फडणवीस

### मी ९० टक्के विकासावर बोलतो

मागच्या निवडणुकीत तुम्ही ज्यांच्या विरोधात बोलला होतात, ते लोक आता तुमच्याबरोबर मंचावर उपस्थित राहणार आहेत. मग यावेळी निवडणुकांच्या प्रचार सभांमध्ये कुणाच्या विरोधात बोलणार? असा प्रश्न यावेळी देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर फडणवीस म्हणाले की, आम्ही मागच्यावेळी उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या विरोधात बोललो होतो. याही वेळेला त्यांच्याच विरोधात बोलू. राहिला प्रश्न आमच्याबरोबर असलेल्या लोकांचा, तरत त्यांचे नेतृत्वही याच दोन नेत्यांनी केले होते. तसेच निवडणुकीच्या प्रचारात मी नकारात्मकतेवर बोलत नाही. माझ्या भाषणातील ९० टक्के मजकूर हा विकासावर, आम्ही केलेल्या कामावर आणि आमच्या पुढील दूरदृष्टीवर आधारीत असतो. केवळ १० टक्के राजकारणावर बोलतो. माझे मानने आहे की, ही निवडणूक नकारात्मक बाबींची नाहीच.

## मनोहर जोशींच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



मनोहर जोशी यांना अखेरचा निरोप देण्यासाठी संजय राऊत, उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्यासह इतर प्रमुख नेत्यांचीही उपस्थिती होती.

मनोहर जोशी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्याआधी त्यांना शासकीय मानवंदना देण्यात आली. मनोहर जोशी हे जोशी सर म्हणून शिवसेनेत प्रसिद्ध होते.

मनोहर जोशी यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा शिवसेना भवनाच्या समोरुनच गेली. बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून मनोहर जोशी यांची ओळख होती.

दादर येथील स्मशानभूमीत मनोहर जोशी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. जोशी सर यांना बाळासाहेब ठाकरे पंत म्हणून हाक मारत.

मनोहर जोशी यांना निरोप देताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते. मनोहर जोशी हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, तसंच त्यांना लोकसभा अध्यक्ष, खासदार अशी पदंही भुषवता आली. शिवसेनेसाठी त्यांनी आयुष्य वेचलं.

दादरच्या शिवसेना भवनासमोरही मनोहर जोशींना अखेरचा निरोप देण्यासाठी गर्दी झाली होती.

मनोहर जोशी यांनी शिवसेनेत असताना विविध पदं भुषवली. बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून त्यांची ओळख होती. आज त्यांचं पार्थिव अनंतात विलीन झालं.

## सरकारने आरक्षण दिले, आता जरांगेंनी अट्टहास सोडावा

**नागपूर :** मराठा समाजाला आरक्षण देताना इतर समाजाचे आरक्षण काढणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आधीच स्पष्ट केले होते. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवत मराठा समाजाला सरकारने आरक्षण दिले आहे. त्यामुळे ओबीसी समाजात समाधान तर मराठा समाजात आनंद व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता जरांगेंनी अट्टहास सोडावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. फडणवीस शुक्रवारी नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

फडणवीस म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण सरकारने दिले आहे. त्यामुळे कोणीही जनतेला त्रास होईल असे आंदोलन करू नये. जरांगे पाटील यांना याबाबत सांगण्यात आले असून त्यांनी आता आंदोलनाचा अट्टाहास सोडावा. आरक्षणाबाबत न्यायालयाने काय म्हटले मला माहिती नाही, असेही ते म्हणाले.

## महाविकास आघाडीत काय सुरू आहे माहिती नाही, प्रकाश आंबेडकर स्पष्टच बोलले !



**अकोला :** वंचित आघाडीने दिलेला मसुदा महाविकास आघाडीने मान्य केल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. त्याचे आम्ही स्वागत करतो. महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी त्यांचा मसुदा आम्हाला द्यावा. त्यामुळे कुठल्या मुद्द्यावर आपले एक मत आहे हे कळेल, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी शुक्रवारी येथे मांडली.

अकोल्यात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आंबेडकर म्हणाले, महाविकास आघाडीत अंतर्गत काय चालू आहे, ते आम्हाला माहिती नाही. आम्ही म्हणालो होतो की, आम्हाला तुमच्या अंतर्गत समावेश करून घ्यायचा असेल, तर तशी इच्छा आमची आहे आणि अधिकार त्यांचा आहे. समावेश करून घ्यायचा नसेल, तर तुमची आधी चर्चा होऊ द्या मग आम्ही वैयक्तिकरित्या पक्षांशी चर्चा करतो. आमचा मसुदा त्यांनी मान्य केला, याचे आम्ही स्वागतच करतो. महाविकास आघाडीने त्यांचा अंतर्गत मसुदा एकमेकांना दाखवला असेल, तो आम्हाला दाखवावा, असे आमचे म्हणणे आहे.

वंचितची अगोदरपासून ही भूमिका आहे की, सगळे पक्ष सगळ्या प्रश्नांवर एकत्र येतील असे नाही. कोणत्या प्रश्नावर आपण विभागलो जातो आणि कोणत्या प्रश्नावर आपण एकत्र येतो, याची जाणीव पक्षांना असली पाहिजे. महाविकास आघाडीच्या २७ तारखेच्या बैठकीचे निमंत्रण अजून तरी आम्हाला आलेले नाही. निमंत्रण आले, तर आम्ही बैठकीला जाणार आहोत. २८ तारखेअगोदर त्यांनी मसुदा आम्हाला सांगितला तर, पुढच्या बैठकीमध्ये निर्णय घ्यायला सोपे जाईल, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

## जबाबदारी दिली तर सरपंच पदाच्या निवडणुकीसाठीही तयारी : अमित ठाकरे



**पुणे :** देशात लवकरच लोकसभा निवडणूक होणार असताना प्रत्येक पक्षाकडून जोरदार तयारी सुरू आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे हेदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा सुरू आहे. यावर अमित ठाकरे यांनी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, '' माझी निवडणूक लढवण्याची कोणतीही इच्छा नाही. पण, पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जर म्हटले तर मी राज्यातून कोठूनही निवडणूक लढविण्यास तयार आहे,'' ते यावेळी म्हणाले आहेत.

कोणतीही जबाबदारी पार पाडणार : पुणे शहरातील विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली सेनापती बापट रोड ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर धडक मोर्चा काढण्यात आला. पुणे लोकसभेसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून तुमच्या नावाची चर्चा सुरू आहे. याबाबत अमित ठाकरे यांना विचारलं असता ते म्हणाले की, ''माझी निवडणूक लढवण्याची इच्छा नाही. परंतु, राज ठाकरेंनी जर मला कुठलीही जबाबदारी दिली तर मी ती यशस्वी पार पाडेल. मला नगरसेवक, सरपंच पदासाठी जबाबदारी दिली तरी ती व्यवस्थित पार पाडेल,'' असेही अमित यावेळी म्हणाले आहेत.

हे खूपच दुर्दैवी : ''माझे मूळ उद्दिष्ट हे विद्यार्थी सेनेचा पहिला कार्यक्रम म्हणून राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात एक युनिट पाहिजे होते. मी प्रत्येक विद्यार्थी, विद्यार्थिनीपर्यत पोहचू शकतो. विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात प्रश्न आहेत. सध्या आमची सत्ता नसल्यानं आम्ही ते प्रश्न सोडवू शकत नाहीत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थापनेपासून ते आजपर्यत जर आपण मेसबाबत भांडण करत असू, तर हे खूपच दुर्दैवी आहे, असंही अमित यावेळी म्हणाले.

एकही केस झालेली नाही : ''विशाखा समिती नेमण्यात आली आहे. ती फक्त विद्यापीठातच ॲक्टिव्ह आहे. बाकी कुठल्याही महाविद्यालयात ही समिती ॲक्टीव्ह नाही. या समितीत फक्त शिक्षिका असून विद्यार्थिनींना घेतल गेलेलं नाही. उपकेंद्र बांधूनही ते सुरू केलेलं नाही. असे अनेक विषय आज कुलगुरू यांच्यासमोर मांडण्यात आले. यावेळी कुलगुरुंनी काही मागण्याही मान्य केल्या आहेत,'' अशी माहिती अमित ठाकरेंनी दिली. पुढे ते म्हणाले, ''मी राजकारणात आल्यापासून एकही राजकीय केस माझ्यावर झालेली नाही. मी माझ्या पहिल्या राजकीय केसची वाट

## प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग भवन उभारणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात एकूण लोकसंख्येच्या ४ टक्के व्यक्तिह्या दिव्यांग आहेत. त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन प्रत्येक जिल्हा मुख्यालयाला सुसज्ज दिव्यांग भवन उभारण्यात येईल. त्याची सुरुवात विभागीय मुख्यालयांपासून होईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेत आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली. बैठकीस रोहयो व फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे, गृहनिर्माण व इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे, आ. रमेश बोरनारे, आ. सतिष चव्हाण, विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर



जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चाचे सादरीकरण केले. मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी जिल्हा परिषदेच्या उपक्रमांचे तसेच मनपा आयुक्त जी श्रीकांत यांनी मनपा मार्फत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांच्या माहितीचे सादरीकरण केले. पोलीस विभागामार्फत होत असलेल्या अद्यावतीकरणाच्या उपाययोजनांबाबत पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांनी माहिती दिली.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, मागणी केल्यानुसार नियतव्यय मंजूर केला आहे. त्यानुसार सर्व मंजूर निधी खर्च करावा. निधी खर्च करण्याचा प्राधान्यक्रम ठरवा म्हणजे महत्त्वाची कामे पूर्ण होतील. येत्या काळात पाणीपुरवठा योजना व दुष्काळी उपाययोजनांचेही नियोजन करण्यात यावे.

ते पुढे म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या शाळांना कुंपण असले पाहिजे त्यामुळे मुलांना शालेय वातावरण मिळते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरणही हाती घ्यावे. जेणे करुन ग्रामिण भागात आरोग्य सुविधा नागरिकांना मिळायला हव्या.

महानगरपालिका साकारत असलेले दिव्यांग भवनाचे सादरीकरण पाहून श्री. पवार म्हणाले की, आपल्या राज्यात लोकसंख्येच्या ४ टक्के दिव्यांगांचे प्रमाण आहे. या दिव्यांगांसाठी सर्व सुविधांनी सुसज्ज दिव्यांग भवन प्रत्येक जिल्ह्यात उभारले जावे. त्यासाठी आराखडा व साधनांबाबत अद्यावत माहितीसह प्रस्ताव तयार करावे. प्रत्येक जिल्ह्यात असे भवन उभारतांना प्रारंभी विभागीय मुख्यालयी दिव्यांग भवन उभारण्यात येतील,असेही

## तटकरे विरूद्ध तटकरे पुन्हा सामना रंगणार

### अनिल तटकरेंचा शरद पवार गटात



**रोहा :** राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरेयांचे भाऊ माजी आमदार अनिल तटकरे यांनीराष्ट्रवादी काँग्रेसच्याशरद पवार यांच्या गटात प्रवेश केला. त्यांना राज्य उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. यामुळे रायगडात तटकरे कुटुंबात राजकीय सामना रंगणार आहे.-ऊत्तएठढखडएचएछ्ढअनिल तटकरे यांचे सुपुत्र अवधूत तटकरे हे रोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष असून, २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत तेराष्ट्रवादी काँग्रेसपक्षाच्या तिकिटावर निवडून आले होते. काही काळानंतर माजी आमदार अनिल तटकरे व अवधूत तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठी देत शिवसेनेत प्रवेश केला. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर अनिल तटकरे पुन्हा एकदा राजकारणात सक्रिय झाले आहेत. तटकरे कुटुंबातील वाद म्हणजे ठरवून केलेले त्यांच्या सोयीचे राजकारण असल्याचे अनेकदा समोर आले आहे, अशी कुजबुज पुन्हा सुरू झाली आहे.सर्वांचे जिल्ह्यातील राजकारणाकडे लक्षएक भाऊ शरद पवार गटात, तर दुसरा भाऊ अजित पवार गटात सक्रिय असल्याने जिल्ह्यातील राजकारणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अनिल तटकरे हे गेल्या आठ ते दहा वर्षांपासून राजकारणापासून अलिप्त राहिले होते. त्यामुळे त्यांचा जनसंपर्क तुटला आहे.आता शरद पवार गटात सामील झाल्याने आपल्याच लहान भावाला शह देण्यासाठी अनिल तटकरे काय खेळी खेळणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत अनिल तटकरे यांची भूमिका निर्णायक ठरेल का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

## माळहिवरा शिवारात भरधाव पिकअपने भाविकांना उडवले; चार ठार तर ४ जण जखमी



**हिंगोली** - जिल्ह्यातील हिंगोली ते कनेरगाव नाका मार्गावर माळहिवरा शिवारात भरधाव पिकअप वाहनाने भाविकांना पाठीमागून धडक दिल्याने झालेल्याअपघातातचार जण ठार तर ४ जण जखमी झाल्याची घटना शनिवारी दि . .२४ सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. मयत व जखमी सिरसम (ता. हिंगोली) येथील रहिवासी आहेत. जखमींवर हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.-ऊत्तएठढखडएचएछ्ढपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली तालुक्यातील सिरसम येथील भाविक दर शनिवारी सिरसम येथून पायी माळहिवरा फाटा येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी येतात. नेहमी प्रमाणे हे भाविक आज पहाटेच सिरसम येथून माळहिवरा येथे पायी निघाले होते. सर्व भाविक माळहिवरा शिवारात आले असतांना हिंगोलीकडून अमरावतीकडे भाजीपाल्याचे रिकामे कॅरेट घेऊन जाणाऱ्या पिकअप वाहनाने भाविकांना पाठीमागून धडक दिली.याअपघातातमनोज गोपाळराव इंगळे (३९), बालाजी बाबुराव इंगळे (३२), सतीष शंकरराव थोरात (२७), वैभव नंदू कामखेडे (२२) यांचा मृत्यू झाला तर जगन प्रल्हाद अडकिणे, उत्तम संतोष गिरी, संतोष सिताराम वसु, राजकुमार भिकाजी घाटोळकर (सर्व रा. सिरसम) हे जखमी झाले आहेत.या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर गावकऱ्यांनी तसेच हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय रामोड, जमादार अनिल डुकरे, आकाश पंडीतकर, किशोर पवार पथकाने सर्वांना हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयात दाखल केले आहे. रुग्णालयात डॉ. मनिष बगडीया, डॉ. नंदकिशोर करवा, डॉ. नितीन पुरोहित यांच्या पथकाने आजारी रुग्णांवर तातडीने उपचार सुरु केले आहेत. यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याने त्याला उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. जखमींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले. या अपघातानंतर पिकअप चालकाला ताब्यात घेण्यात आल्याचे सांगण्यात येतंय. चालकाला डुलकी लागल्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले आहे.

# कांदा निर्यातीचा क्रूर विनोद; प्रत्यक्षात निर्यातीची अधिसूचना निघालीच नाही

सोनिया गांधी पुढे काय करतील? गांधी कुटुंबातला किंवा बाहेरचा पर्यायी नेता देतील का?

१४ मार्च १९९८ रोजी शांततेत झालेल्या बंडाद्वारे सीताराम केसरी यांना बाहेरचा रस्ता दाखवून सोनिया गांध ीत्यांची इच्छा नसतान ाकाँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडल्या गेल्या. त्यावेळी गटबाजीने ग्रासलेल्या पक्षाला एकत्र आणून त्यात नवचैतन्य निर्माण करणे हे त्यांच्यापुढचे सर्वांत मोठे आव्हान होते. २१ मे १९९१ रोजी सोनियाजींचे पती आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाल्यानंतर पक्षनेते/कार्यकर्त्यांनी वारंवार विनंती करूनही पक्षात सामील व्हायला त्यांनी नकार दिला होता. त्यामुळे अध्यक्षपद स्वीकारण्याच्या त्यांच्या निर्णयाचा सर्वांना धक्का बसला. १९९१ साली पंतप्रधानपदासाठी त्यांनी पी. व्ही. नरसिंह राव यांना पाठिंबा दिला होता. १९९७ साली पक्षात अध्यक्षपदासाठी त्यांनी शरद पवार यांच्याऐवजी सीताराम केसरी यांच्या पारड्यात आपले वजन टाकले होते.काँग्रेसमध्येत्यावेळी अंतर्गत बंडाळी उफाळून आल्यामुळे त्यांच्यापुढील आव्हाने वाढली होती. दुसरीकडे अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष बळकट होत चालला होता. सोनिया जन्माने विदेशी असल्याचा मुद्दा हा त्यांच्या वाटेतला मोठा अडसर! नंतर ऑगस्ट २००० मध्ये पक्षाचे उपाध्यक्ष जितेंद्र प्रसाद यांनी बंड केले आणि पक्षाध्यक्षपदासाठी तेसोनिया गांधीयांच्याविरुद्ध उभे राहिले. त्यावेळीही सोनिया यांना मोठ्या कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागले. पुढे त्यांनी उण्यापुऱ्या सहा वर्षांच्या काळातच पक्षाची पुनर्बांधणी केली. २००४ साली डॉ. मनमोहन सिंग यांना पंतप्रधानपद दिले; पुढे १० वर्षे ते सरकार चालले. सोनिया गांधी यांच्याबद्दल आदर वाढला. त्यांच्या सार्वजनिक वर्तनाची प्रशंसा झाली. बदलत्या परिस्थितीत प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी राज्यसभेत जायचे ठरवले. मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या पक्षाचा इमला ढासळताना त्यांना पाहावे लागले. आता पुन्हा सावरून त्या गांधी कुटुंबातला किंवा बाहेरचा एखादा पर्यायी नेता देतात की आपल्या प्रिय पुत्रावरच विसंबून राहतात हे आता पाहावे लागेल. खात्री कोणालाच देता येत नाही.आत्मघाताची कहाणी२००२ साली राहुल गांधी यांनी राजकारणात प्रवेश केला तेव्हा त्यांच्यासाठी सगळे काही ठीकठाक होते. दोन वर्षांच्या कालावधीत पक्ष सत्तेवर आला आणि २००४ साली तेही अमेठीतून लोकसभेवर निवडून गेले. पक्षातील शहाण्यासुरत्या लोकांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी त्यांनी स्वतःचेच म्हणणे रेटायला सुरुवात केली. ए. के. अँटनी यांच्यासारखे त्यांचे गुरुजी इतकेच नव्हे, तर त्यांच्या मातोश्रींचेही ते ऐकेनात. खरेतर मंत्रिपद स्वीकारले असते, तर सरकार कसे चालवले जाते याची कल्पना त्यांना आली असती; पण त्यांनी ही जबाबदारी घ्यायला नकार दिला. सार्वजनिक सभेत कसे बोलावे, याचे प्रशिक्षण आणि हिंदी सुधारणे, याकरिता शिकवणीवर्गाला जायचेही त्यांनी नाकारले. त्यांच्या मातोश्रींनी हिंदीतला लिहून दिलेला मजकूर वाचणे पसंत केले. राहुल मात्र उत्स्फूर्त बोलण्याच्या नादात आत्मघात करून घेत राहिले.अंतःस्थ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार काँग्रेस आणि मित्रपक्ष राहुल गांधी यांनी २०११-१२ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारावे, यासाठी अनुकूल होते. त्यावेळी डॉ. मनमोहन सिंह यांना राष्ट्रपती करण्याचे घाटत होते; परंतु आपल्या नेतृत्वाखाली लढवली गेलेली निवडणूक जिंकूनच आपण पंतप्रधान होऊ, असे सांगून राहुल यांनी त्यावेळी नकार दिला.प्रसंगवशात डिसेंबर २०१७ मध्ये राहुल काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले आणि २०१९ साली लोकसभेत दारुण पराभवाला सामोरे गेले. अमेठी हा बालेकिल्लाही त्यांनी गमावला. जुलै २०२१ मध्ये राहुल यांनी अचानक पक्षाध्यक्षपद सोडून दिले. मल्लिकार्जुन खर्गे यांना पुढे करून मागच्या सीटवर बसून गाडी चालवण्यात राहुल यांना सध्या आनंद वाटतो आहे.प्रियांका गांधींचे आजारपणकाँग्रेसच्या शीर्षस्थ कुटुंबात सगळे काही ठीक चाललेले नाही, असे आतून आलेल्या बातम्यांवरून दिसते. १४ जानेवारी २०२४ रोजी राहुल गांधी यांनी मणिपूरहून 'भारत जोडो न्याय यात्रा' सुरू केली तेव्हा त्यांच्या भगिनी प्रियांका गांधी-वद्रा उपस्थित नव्हत्या. त्या परदेशात निघून गेल्या. येथे अस्वस्थतेची पहिली चाहूल लागली. यात्रा उत्तर प्रदेशात प्रवेश करील, त्यावेळी त्या सामील होतील, असे सांगण्यात आले; परंतु अद्याप तरी त्या आलेल्या नाहीत.राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याकरिता सोनिया गांधी जयपूरला गेल्या तेव्हाच काय त्या प्रियांका त्यांच्याबरोबर दिसल्या; मात्र काहीतरी बिनसलेले आहे, हेच त्यांची देहबोली सूचित करीत होती. 'त्यांची प्रकृती ठीक नसल्याने इस्पितळात दाखल करण्यात आले आहे,' असे आठवडाभरानंतर जाहीर झाले. पुढच्या आठवड्यात त्या इस्पितळातून घरी येऊन कामाला लागतील, असे त्यांच्या निकटवर्तीय नेत्याकडून सांगण्यात आले आहे.आतल्या गोटातून मिळालेल्या माहितीनुसार प्रियांका यांना रायबरेलीत निवडणुकीला सामोरे जाण्याऐवजी राज्यसभेतील जागा हवी होती; पण तसे झाले नाही. राहुल यांना लोकांचा विश्वास कमावता आलेला नाही; या पार्श्वभूमीवर प्रियांका यांना पक्षाचा चेहरा करावे, असे काही ज्येष्ठ नेत्यांना वाटते! गांधी कुटुंबाच्या या कहाणीचा पुढचा अध्याय काय; हे पाहावे लागेल.



## राजगडावर वाय झेड ट्रेकर्सतर्फे शिवजयंती उत्साहात साजरी

**मुंबई :** वा य झेड ट्रेकर्स, या महाराष्ट्रातील अग्रगण्य गिर्यारोहण संघटनेतर्फे दरवर्षीप्रमाणेच यंदाही छत्रपती शिवरायांची पहिली राजधानी असलेल्या राजगडावर शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

वाय झेड ट्रेकर्स तर्फे साजऱ्या करण्यात येत असलेल्या शिवजयंती उत्सवाचे यंदाचे हे ४० वर्ष आहे.

यावेळी राजगडावरील सदर स्वच्छ करून रांगोळ्या व फुलांनी सजवण्यात आली होती

सुमारे ४०० शिवभक्तांनी पारंपारिक वेषात आणि ढोल नगारे, लेझीम यांच्या गजरात पद्मावती माचीवरील पद्मावती मंदिरात, पद्मावती देवीची पूजा करून शिवरायांच्या पालखीला सुरुवात केली.

ही पालखी वाजत गाजत शिवछत्रपतींच्या सदरेवर नेण्यात आली.

तेथे बाल शिवभक्तांनी भाषणे, पोवाडे, शौर्य गीते आदींच्या माध्यमातून शिवरायांचा गौरव केला. प्रमाणपत्रे व सन्मान चिन्ह देऊन या चिमुकल्या शिवभक्तांचा यथोचित सत्कार संघटनेतर्फे यावेळी करण्यात आला. संपूर्ण गडावर यावेळी शिवकालीन वातावरण तयार झाले होते. गडाचा कण आणि कण चैतन्याने भरून गेला होता.या उत्सवासाठी किल्लेदार बापू साबळे यांनी संघटनेला विशेष मदत केली. त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. वाय झेड ट्रेकर्सतर्फे त्यांच्या प्रति तसेच या उत्सवासाठी परवानगी देणाऱ्या पुरातत्व खात्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली आहे.

## पुण्योक अहिल्यादेवी होळकर यांचा राज्यकारभार प्रेरणादायक : उपमुख्यमंत्री अजित पवार

**छत्रपती संभाजीनगर :** पुण्योक अहिल्यादेवी होळकर यांनी जनता सुखी, समाधानी व सुरक्षित रहावी, सामान्य माणसांना न्याय मिळावा यासाठी राज्यकारभार केला. अहिल्यादेवींनी केलेला राज्यकारभार हा प्रेरणा देणारा आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज गंगापूर येथे केले.

गंगापूर येथील जामगाव टी पॉइंट येथे पुण्योक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते आज झाले. आमदार सतीश चव्हाण, माजी आमदार कैलास पाटील, भूषणसिंह राजे होळकर, 'राजे यशवंतराव होळकर प्रतिष्ठान' चे अध्यक्ष रावसाहेब तोगे, माजी नगराध्यक्ष संजय जाधव, अरुण रोडगे यांच्यासह पदाधिकारी व प्रशासनातील अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यात महिलांचा सन्मान केला. त्याच भोसले घराण्यात पुढे महाराणी ताराबाई व होळकर घराण्यात पुण्योक अहिल्यादेवी होळकर या कर्तबगार महिलांनी उत्तम राज्यकारभार केला. त्यांचा राज्यकारभार आजही प्रेरणादायक आहे. ते पुढे म्हणाले की, पुण्योक अहिल्यादेवी यांचे जन्मगाव असलेल्या चौंडी गावाच्या विकासाचा आराखडा तयार करण्याबाबत अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सर्वांना अभिमान वाटावा, असे स्मारक चौंडीत उभारण्यात येईल व त्यासाठी भरीव निधी दिला जाईल. पुणे जिल्ह्यातील वाफगाव येथे किल्ला संवर्धनासाठी तातडीने निधी देऊ असेही त्यांनी सांगितले.

अहिल्यादेवींनी बांधलेले बारव तसेच त्यांनी केलेल्या अन्य कामांचे जतन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. बारामतीत एक हजार कोटीच्या निधीतून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची उभारणी केली असून या वास्तूला पुण्योक अहिल्यादेवी होळकर असे नाव दिले आहे,असेही श्री. पवार यांनी सांगितले. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींचे स्मरण व्हावे, हाच त्यामागील हेतू आहे.

## संकल्प विकसीत भारत अभियान यात्रेच्या माध्यमातून सर्व अनुदानाच्या योजना सर्वसामान्यांच्या पर्यंत आशिष चौहान

**कुरुंदवाड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्यांच्यासाठी आपला संकल्प विकसीत भारत अभियान यात्रेच्या माध्यमातून शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना केंद्र शासनाच्या सर्व अनुदानाच्या योजना सर्वसामान्यांच्या पर्यंत पोहोचाव्यात यासाठी मोहिम राबवली जात आहे. कुरुंदवाड पालिका प्रशासनातर्फे त्याचा प्रसार सुरू असून इतरवेळी ही या योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी पालिकेत असलेल्या केंद्राशी संपर्क साधवे असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी आशिष चौहान यांनी केले.

कुरुंदवाड पालिका चौकात कुरुंदवाड पालिकेतर्फे आपला संकल्प विकसीत भारत रथाचे स्वागत करण्यात आले. प्रशासकता मुख्याधिकारी चौहान यांच्या हस्ते रथाची आणि योजनांच्या केंद्राचे फीत कापून उदघाटन करण्यात आला. जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रा.चंद्रकांत मोरे,तानाजी आलासे आरोग्य निरीक्षक अमोल कांबळे आदी प्रमुख उपस्थित होते.



**कुरुंदवाड येथे आपला संकल्प विकसीत भारतअभियान यात्रा रथाचे फीत कापून उदघाटन करताना प्रशासक तथा मुख्याधिकारी चौहान उपस्थित मान्यवर.**

विकसित भारत संकल्प यात्रेच्या रथाचे पालिका चौकात उत्साहात स्वागत करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत संकल्प यात्रेतील देशभरातील लाभार्थ्यांशी साधलेल्या संवादाचे थेट प्रसारण या कार्यक्रमात करण्यात आले. विविध योजनांसाठी पात्र असलेल्या, परंतु आतापर्यंत लाभ न घेतलेल्या नागरिकांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवण्यात आली. विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

तसेच संभाव्य लाभार्थ्यांची नोंदणीही या वेळी करून घेण्यात आली.२०२४ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या ठिकाणी उज्वला गॅस योजना,आधार कार्ड दुरुस्ती, आयुष्यमान भारत कार्डाचे वितरण, आरोग्य विषयक सल्ला केंद्र आणि शासनाच्या विविध कर्ज योजनांची माहिती देण्यासाठी बँकांच्या प्रतिनिधींचे कक्ष अशा विविध केंद्रातून नागरिक-लाभार्थींना माहिती देण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध व रांगोळी स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वागत आणि प्रास्ताविक कार्यालय निरीक्षक,संगणक अभियंता प्रणाम शिंदे यांनी केले.

यावेळी सुरेश बिंदगे, राजेंद्र फल्ले, राजू अत्तार,गौतम पाटील,प्रभाकर तावदारे,अतिष काटकर,पालिका,तलाठी कार्यालय,आरोग्य विभाग आणि उपजीविका विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## मनोहर जोशी सर : आदर्श शिवसैनिक!



बुजुर्ग शिवसेना नेते मनोहर जोशीसर हे काळाच्या पडद्याआड गेले आहेत. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पान टपरी, रिक्षा चालक, वृत्तपत्र विक्रेता अशा तळागाळातील सामान्य मराठी माणसाला राज्यभरात

' सत्ताधारी ' बनवल्याची उदाहरणे हजारो सापडतील. शिवसेनेच्या पाठिंब्यावर काँग्रेसच्या प्रतिभाताई पाटील यांच्या रूपाने मराठी महिला नेत्याला राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर संधी मिळाली हे खरेच. पण त्यापूर्वी शिवसेना प्रमुखांमुळेच मनोहर जोशी यांच्यारूपाने एका मराठी शिवसेना नेत्याला लोकसभा अध्यक्षाच्या बड्या पदावर विराजमान होण्याची संधी मिळाली. मुंबईच्या महापौर पदापासून लोकसभा अध्यक्ष पदापर्यंत झेप घेतलेले जोशी सर हे यशस्वी उद्योजक, कर्तबगार नेता आणि लोकप्रिय लोकप्रतिनिधी होते. गुणवत्ता त्यांच्यात ठासून भरलेली होती. राज्यातील राजकारणात मोजक्या प्रभावी वक्त्यांमध्ये त्यांची गणती केली जायची.

राजकारणात ज्येष्ठता, अनुभव वाढल्यानंतरही पक्ष - संघटनेतील आपली आज्ञाधारक वृत्ती त्यांनी तसूभरही कमी होवू दिली नाही. याबाबतीत जोशी सर हे शिवसेना प्रमुखांच्या कसोटीला उतरलेले कडवट शिवसैनिक म्हणून जगले, हे वादातीत आहे.

मनोहर जोशी सर हे पक्ष शिस्त, आदेश प्रामाण्य, निष्ठा, गुरू भक्ती, कृतज्ञता यांचे मूर्तिमंत आदर्श उदाहरण ठरले! त्यांचे स्मरण शिवसेनेला चिरकाल होत राहील, यात शंका नाही.

**दिवाकर शेजवळ**
**ज्येष्ठ पत्रकार.**
**कार्यकारिणी सदस्य,**
**मुंबई मराठी पत्रकार संघ.**

## माझी आई श्री सप्तश्रृंगी सिनेमाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर !

**मुंबई :** 'सप्तश्रृंगी' गड नाशिक जवळील नांदुरी गावाजवळ वसलेला असून, अनेक कुटुंबाचे आराध्यदैवत असलेल्या सप्तश्रृंगी देवीचे तीर्थक्षेत्र आहे. हे मंदिर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक म्हणूनही प्रसिद्ध आहे. भारतीय उपखंडातील ५१ शक्तीपीठांपैकी हे मंदिर देखील एक आहे आणि हे असे स्थान आहे जिथे सतीच्या (भगवान शिवाची पत्नी) अंगांपैकी एक, तिचा उजवा हात खाली पडल्याची नोंद आहे. या देवीचा महिमा दर्शवणारा माझी आई श्री सप्तश्रृंगी चित्रपट २५ फेब्रुवारी रोजी शेमारु मराठी बाणा या मराठी वाहिनीवर प्रदर्शित होत आहे. शेमारु इंटरटेनमेंट लि. निर्मित या चित्रपटाचे सह-निर्माते निखिल रायबोले आणि भुपेंद्रकुमार नंदन आहेत.

सप्तशृंगी देवीचे महात्म्य वर्णवणाऱ्या या चित्रपटात सप्तश्रृंगी देवीची निस्सीम भक्त असलेल्या महिलेची कथा गुंफण्यात आली आहे. एका गरीब कुटुंबातील मुलगी श्रीमंत घरची सून होते आणि इथूनच सुरू होते तिच्या संकटांची मालिका. आपल्या भक्ताच्या संकटाला धावून येणारी सप्तश्रृंगी देवी आणि तिची भावभक्ती याचा सुंदर मिलाफ यात दर्शवण्यात आला आहे. कथा,पटकथा आणि सवांद अभिजित पेंढारकार यांचे असून, दिग्दर्शन तानाजी घाडगे यांनी केले आहे, ग्रामीण विषय हाताळण्यात त्यांचा हातखंडा आहे. चित्रपटाचे चित्रीकरण मुंबईसह प्रत्यक्ष सप्तश्रृंगी गडावर देखील झाले आहे.

या सिनेमात नायिका म्हणून मधुरा जोशी पदार्पण करत आहे. यापूर्वी मधुराने अनेक मराठी हिंदी मालिका केल्या आहेत. चित्रपटात तिचा नायक विकास पाटील आहे. सप्तश्रृंगी देवीच्या भूमिकेत शलाका पवार यांनी रंग भरला आहे. संजय कुलकर्णी, मोहन खांबाटे, मनीषा चव्हाण, आरती गोळीवाले, धनंजय जामकर, गणेश सरकटे, वैशाली मानकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. भाग्येश पाटील यांनी सिनेमाला संगीतसाज चढवला आहे. २५ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजता शेमारुमराठीबाणा वाहिनीवर सदर चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर होणार आहे.

## देशातील तरुण वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत : खा.धनंजय महाडिक

### भारतीय जनता युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप

**शिरोळ :** देशातील तरुण वर्ग हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या केलेली चौफेर प्रगतीवर समाधानी असल्यामुळे भारतीय जनता पार्टीत काम करण्यासाठी सक्रिय होत आहे यामुळे नजीकच्या काळात मोठ्या संख्येने तरुणांची फौज भारतीय जनता युवा मोर्चा सहभागी होईल असा विश्वास खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केला

भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्राचे वाटप खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्यांनी नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष डॉ अरविंद माने म्हणाले की भारतातील युवा वर्ग





हा अग्रक्रमाने भारतीय जनता पार्टीच्या विकासनीतीशी जोडला गेला आहे. त्यामुळे युवा वर्गाचे प्रश्न सोडविण्याचे काम भारतीय जनता युवा मोर्चा यशस्वीपणे करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ अरविंद माने यांनी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करताना सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी दिली आहे

भारतीय जनता पार्टी कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष राजवर्धन निंबाळकर बोलताना म्हणाले की गेल्या दहा वर्षात भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशाचा चौफेर विकास साधला सर्वसामान्य जनतेचे मूलभूत प्रश्न सोडवले यामुळेच सर्व जनता आणि तरुण भाजपाकडे आकर्षित होत आहेत. भाजपा व भारतीय जनता युवा मोर्चाचे पदाधिकारी विजयेंद्र माने, सागर वनखांडे, सुशांत पाटील, अजितसिंह काटकर, अमरसिंह भोसले, अमृतमामा भोसले, तय्यब कुरेशी, उदय सरनोबत, पोपट पुजारी, अजिंक्य पाटील,जयेश बुघड, ओंकार बुरांडे, विलास रणदिवे आनंदराव साने संतोष पटवर्धन नितीन आरगे संभाजी भोसले अनिकेत जगदाळे यांच्यासह मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२१, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# देवराम लांडे यांना लागले आमदारकीचे डोहाळे

## गौतमी पाटील चा कार्यक्रम ठेवून केले शक्तीप्रदर्शन



नारायणगाव : पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व आदिवासी नेते तसेच नेहमी काहीतरी वेगळं करून वादग्रस्त ठरायचं व सतत चर्चेत राहणारं व्यक्तिमत्व म्हणजे देवराम लांडे होय. ज्यांची ओळख आदिवासी बांधवांमध्ये आणि संपूर्ण जुन्नर तालुक्यात *आदिवासी वादळ* म्हणून ओळखली जाते अशा देवराम लांडे यांना आता *आमदारकीचे डोहाळे* लागले आहेत.

स्वतःच्याच मुलाच्या लग्नात भान हरपून नाचणं असेल, किंवा आदिवासी मेळाव्यात जोरदार केलेले भाषण असेल, याशिवाय आदिवासी भागातील रस्ते, वीज, पाणी आदी मूलभूत प्रश्नांसाठी अधिकाऱ्यांबरोबर भांडण करणे असेल, अशा प्रत्येक वेगवेगळ्या घटनेत आपल्या भाषणांनी आणि वक्तृत्वाने सातत्याने चर्चेत राहण्याची जणू आवड देवराम लांडे यांना आहे.

म्हणूनच की काय, त्यांचे मूळ गाव असलेले जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील केवाडी गावात गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी देवराम लांडे यांनी त्यांच्या दोन नातींच्या नामकरण सोहळ्यासाठी चक्क आघाडीची नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या डान्स शोचे आयोजन केले होते. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर आघाडीच्या नृत्यांगना गौतमी पाटील हिला ढोल लेझीम या पारंपरिक वाद्यांवर तिची मिरवणूक काढून तिचा आगळावेगळा व अनोखा आदर सत्कार केला.

यामुळेच त्यांनी खाजगी मध्ये आता आपण गौतमीच्या कार्यक्रमाला दहा-पंधरा हजारोंची गर्दी करू शकतो तर आमदारकी का लढवू शकत नाही असा सवाल केला आहे. *त्यामुळे गौतमी पाटील च्या पायगुणाने देवराम लांडे जुन्नर चे आमदार होतील का..? हा येणारा काळच ठरवणार आहे.

दरम्यान गौतमीच्या या डान्स शोला अनेक युवक, युवती, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक देखील उपस्थित होते या कार्यक्रमात हुल्लडबाजी करणाऱ्या युवकांचा बंदोबस्त करण्यासाठी तसेच त्यांच्यावर लक्ष देण्यासाठी मोठ्या प्रमाणात आदिवासी महिलांच्या हातात काठ्या देण्यात आल्या होत्या. यामुळे गौतमीच्या गाण्यावर थिरकणारी तरुणाई यांना आवर घालण्यासाठी स्वतः देवराम लांडे यांना माईक घेऊन महिलांना तुम्हाला काठ्या दिल्या आहेत हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांना ठोकून काढा अशा सूचना देखील देवराम लांडे व्यासपीठावरून देत होते. एवढेच नव्हे तर बंदोबस्तासाठी १०० पोलीस आहेत त्यामुळे धिंगाणा घालू नका अशा सूचना देखील देवराम लांडे यांनी यावेळी दिल्या. कशा पद्धतीने देवराम लांडे यांनी गौतमी पाटील च्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

शाहू क्रीडा मंडळ पन्हाळा यांच्या वतीने

# दिलीप जोशी यांच्या स्मरणार्थ दिलीप चषक व्हॉलीबॉल राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

**पन्हाळा :** शाहू क्रीडा मंडळ पन्हाळा यांच्या वतीने व महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेच्या मान्यतेने शिवछत्रपती पुरस्कार विजेते कै. दिलीप जोशी (सर) यांच्या स्मरणार्थ दिलीप चषक या २१ वर्षाखालील युवक व युवतींच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती मंडळाची सचिव पराग जोशी व सहसचिव सोपान गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पन्हाळ्याला ज्याप्रमाणे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेले आहे त्याचप्रमाणे व्हॉलीबॉल चा

देखील इतिहास फार मोठा आहे. आज पर्यंत शाहू क्रीडा मंडळाच्या माध्यमातून स्वर्गीय दिलीप जोशी यांनी व्हॉलीबॉल साठी फार मोठे योगदान दिलेले आहे त्यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने राष्ट्रीय, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय स्पर्धांचे नेटके नियोजन पार पाडलेले आहे कै.दिलीप जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे वतीने ४९ राष्ट्रीय खेळाडू तर १७०च्या आसपास राज्यस्तरीय खेळाडू घडविण्याचे काम करण्यात आले आहे. मंडळाचे काही खेळाडू अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शाहू क्रीडा मंडळाची दरवर्षी राज्यस्तरीय स्पर्धा घेण्याची परंपरा जोशी सरांनी अखंडित ठेवली होती. पण कोरोना काळात व त्यानंतर सरांचे निधन झाल्याने स्पर्धेला खंड पडला. मात्र सरांच्या पश्चात व्हॉलीबॉल खेळ पन्हाळगडावर जिवंत राहावा व मंडळाकडून उच्च दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

त्याच अनुषंगाने स्वर्गीय दिलीप जोशी यांच्या स्मरणार्थ दिनांक २५ ते २७ फेब्रुवारी दरम्यान २१ वर्षाखालील युवक व युवतींच्या दिलीप चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवस चालणाऱ्या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक, कोल्हापूर ,पुणे ,लातूर, छत्रपती संभाजीनगर ,अमरावती आणि नागपूर या आठ विभागाचे युवक व युवतींचे मिळून १६संघ सहभागी होणार आहेत .या स्पर्धेसाठी या सर्व खेळाडूंची तसेच प्रशिक्षक आणि व्यवस्थापक व स्पर्धेसाठी राज्यस्तरावरील येणारी पंच अशा ३०० लोकांची राहण्याची व जेवणाची मंडळाकडून करण्यात आलेली आहे.

# सातारा जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी ३८१ कोटी रुपयांची मान्यता

## आराखड्यातून पाटण तालुक्यात ६७ कोटी रुपयांची विविध कामे मार्गी लागणार

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळांच्या एकात्मिक विकासाकरिता पर्यटन विकास आराखड्यास गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीत मान्यता देण्यात आली. सातारा जिल्ह्याचे सुपुत्र असलेले मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे हे जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी आग्रही आहेत. त्यांच्या मान्यतेमुळे या आराखड्यासाठी सुमारे ३८१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या आराखड्यातून पाटण तालुक्यात तब्बल ६७ कोटी रुपयांची विविध विकासकामे मार्गी लावून तालुक्यातील पर्यटनवाढीला चालना देण्यात येणार आहे.



गुरुवारी, २२ फेब्रुवारी रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत शिखर समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी सातारा जिल्ह्याच्या एकात्मिक विकास आराखड्यास मान्यता देऊन त्याकरिता सुमारे ३८१ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. या आराखड्यात पाटण तालुक्यातील सह्याद्री व्याघ्र राखीव व वनक्षेत्रातील पर्यटन विकास, तसेच कोयना हेळवाक वन विभागांतर्गत कोयना नदी जलपर्यटन यांच्या कामांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

यात सह्याद्री व्याघ्र राखीव व वनक्षेत्रातील पर्यटन विकासासाठी कुसवडे-कारवट, कोयना-हेळवाक, पाणेरी व भोसगांव आदी विभागांत निसर्ग पर्यटनास पूरक कामे करण्यात येणार आहेत. त्यातून येत्या दोन वर्षांत प्रामुख्याने प्रेक्षागृह, तंबू निवास, सोलर लाइट, फ्लोटिंग जेट्टी, सफारी मार्गाचे बळकटीकरण, पर्यटक सफारीकरीता वाहने, बालोद्यान आदी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी सुमारे ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच कोयना-हेळवाक वन विभागअंतर्गत कोयना नदी जलपर्यटनाला चालना देण्यासाठी पाटण तालुक्यात विकासकामे करण्यात येणार आहेत. यात कोयना ते कृष्णा नदीपात्रातील हेळवाकपासून मल्हारपेठपर्यंत ४१ कि.मी. लांबीचे नदीपात्र जलपर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. त्यात रॅम्प, पॅव्हिलियन, फ्लोटिंग जेट्टी, जेट स्की आदी सुविधांसाठी २२ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निसर्ग पर्यटनाला पूरक विकासकामे व सुविधांमुळे पाटण तालुक्यातील पर्यटनास चालना मिळेल. तालुक्यात यामुळे रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे, असा विश्वास पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केला आहे.



**खा रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त बिबी येथे खाऊ वाटप.**

# खा. रणजितसिंह निबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त बिबी येथे खाऊ वाटप

**आदर्की -** बिबी आणि वाघजाई नगर जिल्हा परिषद केंद्र शाळा बिबी तसेच सरस्वती माध्यमिक विद्यालय बिबी तसेच ज्युनिअर कॉलेज बिबी तसेच जिल्हा परिषद वाघजाई नगर शाळा या ठिकाणी आदरणीय पाणीदार खासदार श्री रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या वाढदिवसा निमित् विद्यार्थ्यांना

मिठाई वाटप करण्यात आले याप्रसंगी माजी चेअरमन मनोहर बोबडे शंकर बोबडे संजय बोबडे भारतीय जनता पार्टी पश्चिम विभाग उपाध्यक्ष अनिल बोबडे ग्रामपंचायत सदस्य विशाल बोबडे संदीप कचरे विक्रम बोबडे विशाल बोबडे याप्रसंगी उपस्थित होते तसेच आदरणीय दादांच्या वाढदिवसाच्या निमित्त मिठाईचे वाटप श्री संदीप कचरे श्री सागर कचरे श्री अनिल कोळपे श्री प्रशांत कचरे यांच्या प्रयत्नातून झाले.

# जलसंधारणाची कामे वाढवणार : युगेंद्र दादा पवार

**आदर्की :** शरयु फौंडेशन व शरयु साखर कारखान्याच्या वतीने जलसंधारण पाणलोट व रस्ते विकासाची भरीव कामे करून परिसराचा कायापालट करणार असल्याचे प्रतिपादन शरयु शुगरचे कार्यकारी संचालक श्री युगेंद्र दादा पवार यांनी केले आहे.

बिबी येथे फौंडेशनने ओढा खोलीकरण कामासाठी मोफत पोकलेन मशीन उपलब्द करून दिले असून सदर कामाची पाहणी करण्यासाठी आज बिबी येथे त्यांनी भेट दिली.

शरयुच्या माध्यमातूम याआधी विध्यार्थ्यांची गैरसोय ओळखून माध्यमिक शाळेसाठी सहा नवीन वर्ग खोल्या बांधून देण्यात आल्या असून सुरक्षेसाठी सी सी टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत, घाडगेवाडी ग्रामपंचायतीस जलजीवन योजनेसाठी पिण्याच्या पाण्याच्या विहरीसाठी भरीव मदत करण्यात आली असून तेथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला आहे.

परिसराचा शास्वत विकास आणि शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती यासाठी शरयु कायम प्रयत्नशील राहणार असून जलसंधरण पाणलोट विकास शेती



**पाहणी करताना युगेंद्र दादा पवार व ईतर.**

सुधारणा ऊस विकास रस्ते दुरुस्ती व सुधारणा आदी कामे प्राधान्याने हाती घेतली जाणार आहेत.

शिवजयंतीचे औचित्य साधून प्रारंभी श्री युगेंद्र दादा पवार यांच्या शुभहस्ते शिव पुतळ्यास पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी बिबी ग्रामस्थांच्या वतीने श्री पवार यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास सरपंच सौ रुपाली बोबडे, शरयुचे संचालक श्री अविनाश भापकर, ग्रामपंचायत सदस्या सौ प्रीती काशीद विकास सोसायटीचे चेअरमन बळवंत नलवडे नंदकुमार कुंभार लोकमतचे वार्ताहर सूर्यकांत निंबाळकर, संदीप काशीद, तुळशीदास बोबडे, डॉ बापू बोबडे, संजय बोबडे, अनिल बोबडे, आदेश बोबडे,अनिल गायकवाड, उदयसिंह बोबडे, लक्ष्मण बोबडे, विनोद बोबडे, प्रदीप बोबडे, जुबेर शेख, सुशील बोबडे, सिकंदर दीक्षित, वैभव कुंभार, विशाल पवार, आदींसह परिसरातील शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

# पुण्यश्लोक काव्यसंग्रह राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**फलटण :** साहित्यप्रेमी सेवाभावी फौंडेशन, फलटण यांच्यावतीने फलटण येथे आयोजित ५ वे राज्यस्तरीय पर्यावरणस्नेही युवा स्पंदन साहित्य संमेलनामध्ये पुण्यश्लोक या संपादित काव्यसंग्रहास राज्यस्तरीय माणगंगा साहित्यप्रेमी पुरस्काराने गौरविण्यात आले. संमेलनाध्यक्ष प्राचार्य रवींद्र येवले, प्रमुख पाहुणे वन परिक्षेत्र अधिकारी दिगंबर जाधव,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य ज्येष्ठ पत्रकार रवींद्र बेडकिहाळ , ज्येष्ठ कवी प्रदीप कांबळे, माणदेशी साहित्यिक ताराचंद्र आवळे, स्वागताध्यक्ष सुगम शहा यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुण्यश्लोक काव्यसंग्रह प्रकाशित करून साहित्य विश्वात नवीन दालन वाचकांसाठी खुले करून दिले आहे. काव्यसंग्रह हा नवकवी, वाचक यांना नव्या आशेने जगण्याची व इतरांना जगविण्याची प्रेरणा देतो. ही बाब कौतुकास्पद आहे. आपणाकडून अशा अनेक नवनवीन साहित्यकृती निर्माण होवून समाजप्रबोधन व समाजहित घडावे . या उद्देशाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे प्रेरणादायी व चिरंतन स्मरण करून देणारे कार्य महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेश येथील एकशे सदोतीस कवी यांच्या विविध प्रकारच्या काव्य रचनांचा संपादित पुण्यश्लोक काव्यसंग्रह पल्लवी मारकड



**पुरस्कार प्रदान करताना रवींद्र बेडकिहाळ, ताराचंद्र आवळे ,रवींद्र येवले प्रमोद कांबळे सुरेश शिंदे व आनंदा ननावरे ,अजित जाधव.**

अजित जाधव व ज तु गार्डे यांनी संपादित केला आहे.

पुण्यश्लोक काव्यसंग्रहास राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल जेष्ठ साहित्यीक सुरेश शिंदे , सौ साधना गावडे , सौ सुचेता हाडंबर, सौ रोहिणी रासकर ,अनिल कुदळे , मधुकर गिलबिले, अरविंद खैरनार यांनी अभिनंदन केले.विविध स्तरातून पुण्यश्लोक काव्यसंग्रह संपादक कवी व शुभचिंतकांचे अभिनंदन केले जात आहे.

# संतकृपाची दुग्धजन्य पदार्थांस ग्राहकांची पहिली पसंती

**आदर्की -** फलटण तालुक्यातील आळजापुरच्या माळरानावर शेतकरयांना न्याय देण्यासाठी संतकृपा दुध प्रकल्पाची उभारणी करून दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध

केली त्याला ग्राऐनपूर महाविद्यालयात आत्मनिर्भर युवती अभियान कार्यक्रम द्वारे पर्यावरण संवर्धन काळाची गरज या विषयावर व्याख्यानाचे आयोजन



ऐनपूर,२३ फब्रुवारी (पीएसआय) ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे

# मुंबई उपनगर जिल्ह्यात महासंस्कृती महोत्सवांतर्गत उद्यापासून बौद्ध आणि शबरी महोत्सव : पालकमंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई :** स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'महासंस्कृती महोत्सव २०२४' अंतर्गत राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून दि. २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी मुंबई उपनगर जिल्ह्यात 'बौद्ध महोत्सव' तर दि. २७ आणि २८ फेब्रुवारी रोजी 'शबरी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. पालकमंत्री श्री. लोढा यांनी आज मंत्रालयात विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यावेळी डॉ. भदंत राहुल बोधी, सामाजिक कार्यकर्ते शरद कांबळे, नितीन मोरे, अरविंद निकाळजे उपस्थित होते.

सर्वोदय महाबुद्ध विहार, टिळक नगर, चेंबूर येथे बौद्ध महोत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी होणार असून, त्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आणि डॉ. भदंत राहुल बोधी यांची विशेष उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, आपल्या भूमीला भगवान गौतम बुद्धांच्या विचारांचा अमोघ वारसा आहे. त्याचप्रमाणे आदिवासी बांधवांच्या संस्कृतीची देणगी आहे. प्रगतीच्या मार्गावर सर्वांना सोबत घेऊन पुढे जायचे असेल, तर आपला वारसा आणि संस्कृती जपणे अतिशय महत्वाचे ठरते. त्याच अनुषंगाने आम्ही या महोत्सवाचे आयोजन केले आहे. बौद्ध बांधवांनी आणि आदिवासी बांधवांनी नेहमीच आपल्या योगदानाने समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची ही संधी असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री श्री.लोढा यांनी केले.''

शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता केंद्रीय मंत्री रामदास आठवले, पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, डॉ. भदंत राहुल बोधी यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. त्यानंतर भीम गीते स्पर्धा, परिसंवाद, संविधान रॅली, धम्मपद भीम गीते यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होईल. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात होणार असून, या दिवशी सामाजिक संस्था परिचय, कला अविष्कार, महिला मेळावा, धम्म सन्मान आणि शाहीरी जलसा असे कार्यक्रम होतील. त्याचप्रमाणे २७ आणि २८ फेब्रुवारी रोजी गोरेगाव (पू.) येथील आरे कॉलनीमधील आदर्शनगर येथे शबरी महोत्सवाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात आदिवासी संस्कृतीचे विविध पैलू उलगडले जातील.

# शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाड्याने देऊ इच्छिणाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन

**मुंबई :** मुंबई शहर जिल्ह्यात इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता १०० मुलींची क्षमता आणि १०० मुलांची क्षमता असलेले वसतिगृह सुरु करण्यात येणार आहेत.

मुंबई शहर जिल्ह्यात दहा हजार चौ. फुट स्वतंत्र क्षेत्रफळाची जागा असलेल्या शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाड्याने देऊ इच्छिणाऱ्या इमारत मालकांनी संपर्क साधण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक मुंबई शहर यांनी केले आहे.

मुंबई शहर जिल्ह्यातील स्वतंत्र मुला-मुलींच्या वसतिगृहाकरीता दहा हजार चौ. फुट स्वतंत्र क्षेत्रफळाची जागा असलेल्या खासगी इमारतीच्या मालकांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग भाडे निश्चित करुन देईल. त्या भाडेकरारावर देण्यास तयार असलेल्या मुंबई शहर जिल्ह्यातील खासगी इमारतीच्या मालकांनी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मुंबई शहर, प्रशासकीय इमारत, भाग-१, चौथा मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००७१ या कार्यालयाशी दि. १ मार्च २०२४ पर्यंत संपर्क साधावा.

# भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी नारी शक्तीने मोदींना साथ द्यावी : शंकर जगताप

**पिंपरी :** भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार देशातील या चार घटकांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यात देशातील गरीब, तरूण, शेतकरी आणि महिलांचा समावेश आहे. या चार जातींचा विकास होईल तेव्हाच देशाचा विकास होईल, यावर मोदी सरकारचा विश्वास आहे. या चारही घटकांच्या विकासासाठी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी नारी शक्तीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.

पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात नारी शक्ती वंदन अभियान कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

शंकर जगताप म्हणाले, नरेंद्र मोदी हे या देशाचे पंतप्रधान झाल्यापासून महिलांचा विकास हा केवळ कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता देशाच्या विकासगाथेच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. भारताच्या प्रगतीमध्ये महिलांनी




बजावलेल्या भूमिकेला पंतप्रधान मोदी यांनी कायमच वंदन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे. हा संकल्प साध्य करण्यासाठी देशातील महिला शक्ती ही सर्वात मोठी हमी असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले आहे.

मोदी सरकार महिला सबलीकरण प्रक्रिया अविरत चालवित आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील हे सरकार विविध प्रभावी योजना व उपक्रमांद्वारे महिला सक्षमीकरणासाठी महिलांना सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने काम करत आहे. महिलांचे सक्षमीकरण ही मोदींची गॅरंटी आहे.

त्यांनी नारी शक्ती वंदन कायदा करून महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे स्टँडअप इंडिया योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, महिला कॉयर विकास योजना, महिला समृद्धी योजना, अन्नपूर्णा योजना, स्त्री शक्ती योजना, पंतप्रधान धनलक्ष्मी योजना, फ्री शिलाई मशीन योजना, पंतप्रधान आवास योजनेत महिलांच्या नावे घर, उज्ज्वला गॅस योजना यांसारख्या विविध योजना राबवून महिलांना सक्षम करण्याचा मार्ग तयार केला आहे. या योजनांचा गरजू महिलांनी लाभ घ्यावा.

मोदी सरकार लखपती दिदी बनविण्याची योजना राबवित आहे. त्याअंतर्गत देशातील बचत गटातील एक कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्यात आले आहे. आता तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्याचे सरकारचे टार्गेट आहे. तीन कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील महिलांकडून पाठिंबा मागितला आहे. देशाला विकसित राष्ट्र करताना या तीन कोटी महिलांचे मोठे योगदान असणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील महिलांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार अश्विनी जगताप व भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सुजाता पालांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या महिला, शून्य कचरा संकल्पात योगदान देणाऱ्या महिला, तृतीय पंथीयांसाठी काम करणाऱ्या महिला तसेच समूह संघटिका, आशा वर्कर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी आमदार अश्विनी जगताप, भाजपचे प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मेडिगेरी, अजय पाताडे, उपाध्यक्ष राजू दुर्गे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळुराम बारणे, माजी नगरसेवक सागर अंघोळकर, प्रमोद ताम्हणकर, बिभीषण चौधरी, योगेश चिंचवडे, महिला आघाडी अध्यक्षा सुजाता पलांडे, माजी नगरसेविका सविता खुळे, संगीता भोंडवे, अश्विनी चिंचवडे, मनीषा पवार, अनुराधा गोरखे, शोभा थोरात, ज्योती भरती, कुंदाताई भिसे, भरती विनोदे, कविता हिंगे, बिंद्रा गणात्रा, शारदा मुंढे, स्वाती नेवाळे, पल्लवी पाटकर, कविता खराडे, पल्लवी वाल्हेकर, पियुषा पाटील, समूह संघटिका रेश्मा पाटील, अश्विनी संगेकर, वैशाली खरात, शारदा धनशेट्टी, सुवर्णा भालेराव, मंगला वाडकर, चंचलाताई जमधडे आदी उपस्थित होते.

---

# बुध्द विहाराच्या कामासाठी २० लाखांचा निधी



**वडगाव मावळ :** नाणे मावळातील वळक गावात (चरींरश्र)बुद्ध विहाराच्या कामाचे भूमिपूजन गुरुवारी(दि. २२) संपन्न झाले.

एक हजार चौरस फूट जागेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने बुद्ध विहाराचे काम केले जाणार आहे.यासाठी आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.

या भूमिपूजन समारंभास सामाजिक कार्यकर्ते सनी जाधव,उपसरपंच सुनिल बांगर,ग्रामपंचायत सदस्य सदाशिव बांगर,संदीप जाधव,अमोल थोरवे,मच्छिंद्र थोरवे,रोहिदास वाघमारे,सागर रणपिसे,प्रल्हाद जाधव,अर्जुन रणपिसे,राजेंद्र रणपिसे, बबन जाधव,गुलाब जाधव,आदि ग्रामस्थ व महिला भगिनी उपस्थित होत्या. आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून ग्रामविकास निधी २०२३-२४अंतर्गत वीस लाख रुपये निधी उपलब्ध झाला आहे. स्थानिक ग्रामस्थांकडून होत असलेल्या मागणीनुसार एक हजार स्क्वेअर फुटामध्ये आरसीसीचे बांधकाम होणार असून सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे.

# मेट्रोपोलिस फौंडेशन (हेल्थ केअर लिमिटेड )मुंबई यांच्या सहकार्याने गरजु मुलींना मोफत सायकल वाटप

**माळशेज :** माळशेज, करंजाळे दि. २३ रोजी मेट्रोपोलीस फौंडेशन मुंबई यांच्या सहकार्या ने गरजु मुलींना मोफत सायकल वाटपकरण्यात आले. संस्थेचे ट्रस्टी सफला श्रॉफ मॅडम डॉ.प्रकाश पाळंदे अध्यक्ष NISD संस्था यांनी एकूण ७५ सायकल वाटप केले या सायकल तळेरान, मढ, सीतेवाडी, कोळवाडी, करंजाळे, खिरेश्वर, पिंपळगाव जोगा परिसरातील गरजू मुलींना वाटप केल्या.तसेच NISD संस्थेचे पदाधिकारी मंगल मॅडम, दारोळे



सर, मदने सर उपस्थित होते. तसेच NISD संस्थेचे श्री शिंदे सर व शिंदे मॅडम यांचे इतर सहकारी यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आहेर सर यांनी केले व आभार नलावडे सर यांनी मानले.तळेरान गावचे सरपंच गोविंद साबळे पोलीस पाटील उपस्थिती होते.

---

# मुबंईच्या कोळी बांधवानाच्या जेजुरी माही यात्रेत महाराष्ट्र विधान भवन अध्यक्षांची हजेरी

कोळी बांधवांच्या माही पौर्णिमा पालखी सोहळ्यात राहुल नार्वेकरांची उपस्तीथी, कुलब्यात उभारणार खंडोबा मंदिर जेजुरी =(विजयकुमार हरिश्चंद्रे ) खंडोबा नगरीत माही पौर्णिमा यात्रेच्या कुलाबाकर पालखी सोहळ्यात महाराष्ट्र विधानभवन अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि पुरंदर तालुका काँग्रेस आमदार संजय जगताप यांनी उपस्तीथी दर्शवत कुलाबकरांच्या जेजुरी चिंच बागेतील कुलदैवत खंडोबा पालखी सोहळ्यातील कुलब्यात उभारण्यात येणाऱ्या नियोजित भव्य आशा खंडोबामंदिर प्रतिकृतीचे उदघाट्न केले तर त्यांच्या आनंद यात्रा सोहळायची पाहाणी केली यावेळी कुलाबाकर कोळी बांधवांच्या वतीने पारंपरिक कोळी परंपरेची टोपी ही नार्वेकर आणि जगताप यांना परिधान करण्यात आली. यावेळी कुलाबाकर बांधवांच्या वतीने या आनंद सोहळ्यात विविध देवीदेवतां महापुरुषांची आणि आधुनिक पारंपरीक वैशाभूषा करण्यात आली होती.



खंडोबा नगरी जेजुरी हे कोळी बांधवांचे श्रद्धा भक्तीचे ठिकाण असून शेकडो वर्षांपासून कुलाबाकर कोळी समाज जेजुरी माघ पौर्णिमा यात्रेला येत असतो म्हणूनच समस्त कुलाबाकरांच्या श्रद्धे भक्ती करिता कुलब्यात भव्य असे खंडोबा मंदिर उभारणार असल्याचे नार्वेकर यांनी जाहीर केले असून जेजुरीत त्यांना यात्रेला दरवर्षी येण्याकरिता सुसंज्ज निवास व्यवस्थाही चिंचबन परिसरात करण्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले पालखी सोहळ्यातील आनंद मेळाव्यात नार्वेकर यांनी आनंद घेत त्यांच्याबरोबर नृत्यचाही आनंद लुटला या प्रसंगी पालखी सोहळ्यात कुलाबाकरांच्या वतीने दिलीप कोळी,ऍड जितेंद्र कोळी जेजुरी मार्तंड देवस्थान अध्यक्ष अनिल सौन्दडे, ट्रस्टी अभिजित देवकाते मंगेश घोणे, पांडुरंग थोरवे भाजपचे सचिन पेशवे भाजपाचे निलेश जगताप जेजुरी नगरसेवक सचिन सोनवणे भाजपा कोल्हापूर प्रभारी अलका शिंदे साकेत जगताप, विक्रम माळवदकर, शिवसेना भाजपा आणि संघ कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्तित होते यंदाच्या यात्रेत मात्र कोळी बांधवांची संख्या जरी अल्पशा असली तरी मात्र यात्रेतील उत्साह जोश कायम होता.

# वडगावात ११२ वाहनांची मोफत वायू प्रदूषण चाचणी

**वडगाव मावळ :** माजी नगरसेवक प्रसाद पिंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त वडगाव शहर भाजपच्या वतीने वाहनांची मोफत पीयूसी चाचणी करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये ११२ वाहनांची मोफत पीयूसी चाचणी करून वाहन धारकांना मोफत प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. वाहनांमुळे वायू प्रदूषण कमी व्हावे या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला.



वडगांव नगरपंचायतचे नगरसेवक आणि वडगांव शहर भाजपा कार्याध्यक्ष प्रसाद अरविंद पिंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष,वडगांव शहराच्या वतीने बुधवार दि.२१ रोजी चावडी चौक, वडगांव मावळ येथे दोन आणि तीन चाकी वाहनांसाठी मोफत वायू प्रदूषण चाचणी शिबीर ( झणउ ) व प्रमाणपत्र वाटप या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा ११२ वाहन चालकांनी लाभ घेतला.

ज्येष्ठ नेते अरविंद पिंगळे,पंढरीनाथ भिलारे,सोमनाथ काळे,दीपक बवरे, प्रदीप बवरे,मा.नगरसेवक प्रवीण चव्हाण,ड.विजय जाधव, शामराव ढोरे,रवींद्र काकडे,भूषण मुथा, शंकर भोंडवे,रविंद्र म्हाळसकर,शहर सरचिटणीस मकरंद बवरे,सचिन ढोरे, वडगांव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन निलेश म्हाळसकर,संचालक ड.अजित वहिले,मा.सरपंच नितीन कुडे,संभाजी म्हाळसकर,सुधाकर ढोरे,पत्रकार ज्ञानेश्वर वाघमारे-,विजय सुराणा,बाळासाहेब भालेकर, गणेश विनोदे,रामदास वाडेकर,नंदकुमार जाधव,महेंद्र बा. म्हाळसकर,संतोष भालेराव,मनोज जाधव,मनोज पोफळे, गणेश भेगडे , महेंद्र अ.म्हाळसकर, संतोष म्हाळसकर,सतीश म्हाळसकर,सुरेंद्र बाफना,दीपक पवार,विकास पिंगळे, रिचा पिंगळे,श्लोक पिंगळे,वरद पिंगळे, सवानंद भालेकर,देवेश भालेकर आदी कार्यकर्ते,पदाधिकारी सदर उपक्रमास उपस्थित होते.

# संगमनेरच्या मुलीने 'विमर्श'ची अप्रतिम पेंटिंग करून घडविला इतिहास

## चित्रकार अदिती मालपाणींच्या कलाकृतीने घातली सर्वांना मोहिनी

**पुणे :** शहरात कलाकारांची कमतरता नाही. कलाकारांच्या माध्यमातूनच राज्याची संस्कृती देशभर आणि जगभर पोहोचण्यास मदत होत आहे. अशाच प्रतिभाशाली कलाकारांच्या मालिकेतील युवा चित्रकार अदितीने शक्ती, चैतन्य आणि समृद्धीचे प्रतीक असलेल्या दुर्गा, सरस्वती आणि लक्ष्मी या त्रिमूर्तीचे अप्रतिम चित्र साकारून सर्वांची मने जिंकली आहेत.

रामजन्मभूमी तीर्थस्थळ निर्माण समितीचे कोषाध्यक्ष व गीता परिवाराच्या राष्ट्रीय अध्यक्ष पूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या ७५ व्या जन्मोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र आळंदी येथे गीता परिवार आयोजित भव्य गीता भक्ती अमृत महोत्सवात आदिती मालपाणी यांनी चितारलेले 'विमर्श' हे चित्र स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांना भेट म्हणून देण्यात आले. त्यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांनी वरील उद्गार



काढले.

ते पुढे म्हणाले की, अदितीने चित्रकला पुरेपूर आत्मसात केली आहे. या चित्राचे बाह्य कवच माझ्या स्वतःच्या पूज्य गुरूंच्या 'ओम नमः शिवाय' च्या आवाजाने उघडते. यावेळी देवीचे सौंदर्य पाहून मन प्रसन्न होते. ते पुढे म्हणाले की असे मानले जाते की विश्वाची निर्मिती ध्वनीद्वारे झाली आहे, म्हणून मी त्रिमूर्तीची शक्ती पाहण्यासाठी माझ्या गुरूंच्या मुखातून निघणारा दिव्य आवाज निवडला आहे. ओंकार प्रणवोच्चार ध्वनीने बाह्य चित्र उघडले जाते हे त्याचे वैशिष्ट्य आहे. तसेच या कलाकृतीमध्ये तबला, वीणा, सतार या भारतीय वाद्यांचा मधुर आवाज ऐकू येतो आणि आतून दिव्य प्रकाश पसरतो. माँ सरस्वती, माँ लक्ष्मी आणि माँ दुर्गा यांच्या ऊर्जेचा स्पर्श झाल्यासारखे वाटते.

बाबा रामदेव म्हणाले, हे देवीचे अप्रतिम चित्र आहे, ते पाहून मन प्रसन्न होते आणि ध्यानावस्थेत पोहोचते. व्यासपीठावर उपस्थित बहुतांश सर्वच थोर संतांनी सांगितले की,त्यांनी अशा स्वरूपाची अद्भुत कलाकृती प्रथमच पाहिली आहे. अडमा आर्टच्या अदितीने चित्रकलेतून संदेश दिला आहे की, सर्जनशील कला ही सर्वोच्च शक्तीशी जोडली गेली तरच उत्कृष्ट कलाकृती जन्म घेते. जेव्हा माणूस सर्व काही विसरतो आणि त्या शक्तीच्या चरणी लीन होतो तेव्हाच आंतरिक चैतन्य सृजनशील कार्य करते. ६ बाय ६ फूट आकाराच्या या पेंटिंगमध्ये पृथ्वी, पाणी, अग्नि, वायू आणि शून्य या पाच घटकांचा समावेश आहे. या कलाकृतीचे वैशिष्ट्य म्हणजे ते यांत्रिकी, संगीत, उत्पादन डिझाइन या सर्व गोष्टींपासून कलेची जोड देऊन तयार केले आहे.

या चित्राच्या निर्मितीचा प्रवास उलगडून दाखविताना अदिती ने सांगितले की हे चित्र स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांच्या श्रीयंत्राच्या संकल्पनेवर आधारित आहे. स्वामीजींच्या पावन सान्निध्यात व छत्रछायेखाली श्रीयंत्राचा अभ्यास करत असताना तिला एका दैवी शक्तीशी आंतरिक परस्पर संबंध जाणवू लागला त्यातून या चित्राची कल्पना सुचली .असे वाटले की जणू काही शक्तीच माझ्याद्वारे हे काम घडवत आहे. माझी कल्पनाशक्ती साकारण्यात परमेश्वरी आशीर्वाद, पाठबळ यांचे स्पष्ट संकेत मला जाणवले. जणू काही मंदिरातील देवीचे दर्शन घडत आहे आणि तिची ऊर्जा चहूबाजूंनी माझ्यावर वर्षाव करीत आहे याची अनुभूती मला आली.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध मालपाणी उद्योग समूहाचे संचालक डॉ.संजय आणि अनुराधा मालपाणी यांची कन्या अदिती हिला लहानपणापासूनच कलेचे आकर्षण होते. तिने स्पेनमधील बार्सिलोना येथे इंडस्ट्रियल डिझायनिंगचे उच्चस्तरीय शिक्षण घेतले आहे.

# निरंकारी मिशन मार्फत 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' परियोजनेचा रविवारी दूसरा टप्पा

**माळशेज :** प्रोजेक्ट अमृत अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' परियोजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे आयोजन रविवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ०८:०० वाजता सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात करण्यात आले आहे.



संत निरंकारी मंडळाचे सचिव तथा समाज कल्याण विभागाचे प्रभारी जोगिन्दर सुखीजा यांनी या विषयी माहिती देताना सांगितले, की 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या आदर्श घोषवाक्यातून प्रेरणा घेत ही परियोजना अवघ्या भारतवर्षात जवळपास १५०० पेक्षा अधिक ठिकाणी, २७ राज्यें व केंद्र शासित प्रदेशांतील ९०० शहरांमध्ये एकाच वेळी राबविली जाणार आहे. पुणे जिल्हाच्या विविध भागातून वाहणाऱ्या इंद्रायणी, मुळा, मुठा,भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकडी, मीना, कऱ्हा, आनंदी अशा जवळ जवळ सर्वच नद्यांचे घाट तसेच शहरातील विविध तलाव अशा ४३ ठिकाणी एकाच वेळी विशाल स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे ज्यामध्ये ओंकारेश्वर नदी घाट, कात्रज तलाव, आळंदी-देहू येथील इंद्रायणी नदी घाट,मोरया गोसावी येथील पवना नदी घाट, जुन्नर येथील खालचा माळीवाडा भास्कर घाट इत्यादी ठिकाणे प्रमुख आहेत अशी माहिती मिशनचे पुणे जिल्ह्याचे प्रभारी ताराचंद करमचंदानी यांनी दिली. या परियोजनेचा मुख्य उद्देश जलसाठ्यांचे संरक्षण, त्यांची स्वच्छता व जनसामान्यांमध्ये याविषयी 'जागरूकता अभियान' राबवून त्यांना प्रोत्साहित करणे हा आहे.

# कर्म,ज्ञान व भक्तियोगाने मानव सुखी होतो डॉ. निशिकांत श्रोत्री यांचे विचार

**पुणे :** मन करारे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण, या उक्ती नुसार प्रत्येक मनुष्य हा सुखी राहू शकतो. त्यासाठी कर्म, ज्ञान आणि भक्ती योग हा अत्यंत महत्वाचा आहे. कर्मयोगात सेवा महत्वाची असून अहंकाराला तिलांजली दयावी. तरच मानव हा शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक स्तरावर सुखी राहतो. असे विचार ज्येष्ठ साहित्यीक डॉ. निशिकांत श्रोत्री यांनी व्यक्त केले.

तितिक्षा इंटरनॅशनल आणि प्रोलक्स प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी पुण्यातील जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन येथे आयोजित पहिली आंतरराष्ट्रीय आरोग्य आणि सांस्कृतिक परिषद २०२४ संपन्न झाली. यावेळी लेखिका डॉ. प्रचिती पुंडे लिखित 'वेलनेस रीडिफाइंड' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या प्रसंगी डॉ. आशितोष मिसाळ हे मुख्य अतिथि म्हणून



उपस्थित होते. तसेच जापान येथील डॉ.कोटा नागुची, लेखिका डॉ. प्रचिती पुंडे आणि तितिक्षा इंटरनॅशनल फाउंडेशनच्या प्रिया दामले यांची प्रमुख उपस्थिती होती.

साहित्य क्षेत्रात आयुष्यभर अमुल्य योगदान दिल्याबद्दल मधुसुदन घाणेकर, समाजिक, साहित्यीक, काव्य, नाट्य, सेवा व एनजीओ क्षेत्रातील कार्यकरणार्या व्यक्तींचा आणि आर.के मिडियाचे संचालक रामहरी कराड यांना शाल व सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

डॉ. निशिकांत श्रोत्री म्हणाले,डब्ल्यूएचओ ने शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्यवर विस्तृत विवेचन केले आहे. आध्यात्मिक आरोग्य महत्वाचे असून अधि आत्मा म्हणजे, ब्रह्मतत्व त्यांनंतर कॉस्मिक एनर्जी कशी असते याचा उलगडा केला. त्याचप्रमाणे धन्वतरी, शुश्रुत, चरक आणि शारंधर हे वैद्यकीय शास्त्रातील सर्व प्रथम आहेत. हे पुस्तक आरोग्याच्या क्षेत्रातील सर्वोत्तम असून सर्वांसाठी लाभदायक राहिल.

डॉ. प्रचिति पुंडे म्हणाल्या, 'ग्लॅमर' आणि 'निरोगीपणाच्या' अभूतपूर्व मिश्रणातून संपूर्ण जगाला ग्लॅमवेलची नवी ओळख या पुस्तकातून होईल. ग्लॅमोवेल तत्वज्ञान २:२ ह्यूमन कोकोरो संकल्पनेवर आधारित आहे.